RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate

● Mailing Address ●

Dr. Sadashiv H. Sarkate
Editor : POWER OF KNOWLEDGE
Head of Dept. Marathi
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

Price : Rs. 300/-
Annual Subscription: Rs. 1000/-

Power of Knowledge Peer Review Journal,Volume:II, Special Issue Oct. 2020 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286

# भारतातील दलित चळवळीत दलित महिलांचे योगदान

प्रा.डॉ.जाधवर बी.डी.
इतिहास विभाग प्रमुख
बलभीम महाविद्यालय, बीड

**प्रस्तावना :-**

प्राचीन, मध्ययुगीन, आणि आधुनिक कालखंडाचा विचार केला असता असे दिसते की, वरील तिन्ही कालखंडात जगाच्या पाठीवरील अनेक देशात वेगवेगळी आंदोलने चळवळी घडुन आलेल्या होत्या. या सर्व गोष्टीच्या नोंद इतिहासाने घेतलेल्या आहेत. त्यानुसार भारतात सुध्दा अनेक हिंसक अहिंसक घटणा घडलेल्या होत्या. त्या घटनांची कारणे शोधने येथे योग्य नाही. परंतु परकीय सत्तानी भारतावर सातत्याने आक्रमणे करण्याची भुमीका धारण करुन देशावर आपले प्रभुत्व निर्माण केलेले होते. मग यामध्ये इंग्लड शिपाय अनेक देशांचा समावेश होता. इ.स. १६०० मध्ये ब्रिटिशानी ब्रिटीश इस्ट इंडीया कंपनीची स्थापना करुन देशावर आपले वर्चेस्व प्रस्थापित केलेले होते. स्थापित केलेले प्रभुत्व नष्ट करण्यासाठी देशात राजकीय, सामाजिक, धार्मीक पातळीवर अनेक चळवळी सुरु होत्या. वरील सर्व चळवळीत पुरुषांचाचे सहभाग होता असे म्हणता येणार नाही. यामध्ये देशात वास्तव्य करणाऱ्या स्त्रीयांचा पण सहभाग होता. मग या चळवळीत भाग घेणाऱ्या महिला ह्या सवर्ण असतील किंवा दलीत. एकंदर देशातील चळीवळी आंदोलने आणि यामध्ये सहभागी झालेल्या स्त्रीया या विषयी थोडेसे मंथन केल्यानंतर असे दिसते की अनेक आंदोलनात स्त्रीयांनी सहभाग नोंदवला पण नोंदवलेल्या सहभागाच्या नोंदी मात्र फक्त पुरुषांच्या आणि सवर्ण महिलांच्या कार्याच्याच घेतल्या गेल्याचे दिसते.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी विविध चळवळी सुरु झाल्या तेव्हा यात दलित महिलांनी सुध्दा मोठ्या प्रमाणावर योगदान दिलेले होते. परंतु त्यांच्या योगदानाकडे मात्र फारसे लक्ष दिलेले नाही. त्या अनुषंगाने या शोधा निवंधात मी त्यांचे कार्य नमुद करणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार हे सर्व मान्य आहे. कारण जनसामान्यासाठी त्यांनी केलेले कार्य हे अविस्मरणीय आहे. त्यांच्या कार्याने आणि विचाराने समाजातील विविध घटकात पसरलेला आंधार नष्ट होवून प्रकाश दिसला असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. त्यांनी जे विचार स्पष्ट केले त्या विषयी असे म्हणता येईल की, डॉ.आंबेडकरांनी अनेक वेगवेगळ्या सभा व परिषदांच्या व्यासपिठावरुन दलित महिलांना उपदेश केलेले होते. २७ डिसेंबर १९२७ रोज महाड येथे आयोजित सभेत स्त्रीयांना मार्गदर्शन करताना असे म्हटले की दलित स्त्रीयांनी लुगडी नेसण्याची पध्दत बदलावी सवर्ण स्त्रीयांच्या प्रमाणे पेहराव धारण करावा. हातात गळ्यात सौंदर्य प्रसादनाचे जे साहित्य वापरतात ते सवर्ण स्त्रीया प्रमाणेच वापरावे. स्वच्छ रहा जनावरांचे मांस खाऊ नका, मुर्लीना शिक्षणासाठी